# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/U/126/2008/47/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**Circle office , M.S.E.D.C.L.,**
**JALNA**

Sub:- Forwarding of grievance in respect of Smt. Nirmaladevi J.Agrawal, Mantha , Jalna (Consumer No. 510030343016 & 510030359735)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Smt. Nirmaladevi J.Agrawal, Mantha , Jalna (Consumer No. 510030343016 & 510030359735)

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing in this matter is kept on 16/09/2008 at 11=30 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :
Smt. Nirmaladevi J.Agrawal,
Narayan nagar, Mantha ,
**Jalna**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२६/२००८/४७**

**तक्रार दाखल दिनांक ;- २७/०८/२००८**
**निकाल दिनांक ;- ३०/०९/२००८**

**१) सौ.निर्मलादेवी जुगलकीशोर अग्रवाल,**
**रा.नारायण नगर मंठा चौफुली,जालना,**
**ता.जि. जालना. (ग्राहक क्र.५१००३०३४०१६)**
**२) श्री पांडुरंग बकटलाल अग्रवाल,**
**रा.नारायण नगर मंठा चौफुली,जालना,**
**ता.जि. जालना. (ग्राहक क्र.५१००३०३५९७३५)**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जालना**

विषयः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६) च्या अंतर्गत गा-हाणे.

वरील दोन्ही अर्जदाराचे आम मुखत्यार श्री जुगलकिशोर बंकटलाल अग्रवाल यांनी ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची- अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २६/०८/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०८/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) दोन्ही अर्जदाराने दिलेल्या आममुखत्यार पत्रानुसार श्री जुगलकिशोर बंगटलाल अग्रवाल यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार महावितरण वीज कंपनीकडुन त्यांच्या नारायन नगर मंठा रोड जालना येथील घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. दिनांक ०२/०१/२००८रोजी त्यांच्या वीज मिटरची पाहणी करून त्यांच्या विरूध्द वीज चोरीचा गुन्हा दाखल करून पोलीस केस करण्याची धमकी देवुन वीज चोरीचे बिल तसेच तडजोड रक्कम वसुल करण्याची मागणी करण्यात आली. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांनी या धमकीला घाबरून व बदनामी होऊ नये म्हणून वरील रक्कम भरली. रक्कम भरल्यानंतर त्यांनी महावितरणच्या संबंधीत अधिका-याकडे या वीज चोरीच्या बिलाबाबत अपिल दाखल केले पण महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-याने ते फेटाळुन लावल्यामुळे त्यांनी या चुकीच्या बिला बाबत मंचात तक्रार दाखल केली असुन हे चुकीचे वीज बिल रद्द करण्याबाबत व नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२)	दिनांक १६/०९/२००८ रोजी अर्जदाराचे प्रतिनिधी श्री जुगलकिशोर अग्रवाल तसेच नोडल अधिकारी श्री सागसकर तसेच सौ. औढेकर कनिष्ठ अभियंता जालना हे महावितरण कंपनीतर्फे उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला, दिनांक ०२/०१/२००८ रोजी अर्जदाराच्या मिटरची तपासनी केली असता त्यांनी वीज चोरी केली असल्याचे आढळुन आल्यामुळे त्यांना वीज चोरीचे देयक व तडजोडीचे देयक अशी दोन देयेके देण्यात आली ज्याचा भरणा त्यांनी केलेला आहे. त्यांनी वरील कार्यवाही करतांना अर्जदारास कोणत्याही प्रकारची धमकी दिलेली नसुन वीज कायद्यातील तरतूदीचे पालन केले असल्याचे सांगितले अर्जदाराची मिटरची तपासणी करतांना मिटरला लावण्यात आलेले बॉडी सिल ही तोडलेली आढळली त्यामुळे कायद्यातील तरतुदीप्रमाणे अर्जदारास दिलेले वीज चोरीचे बिल योग्य असल्यामुळे महावितरणच्या संबंधीत अधिका-याने अर्जदाराची या संदर्भात केलेले अपिल फेटाळण्यात आले असल्याचे त्यांनी आपल्या जबाबात म्हटले आहे.सुनावणीच्यावेळी अर्जदाराच्या जागेत चार नविन मिटर बसविण्यात आल्याची माहिती समोर आल्यामुळे मंचाने नोडल अधिकारी यांना या नविन मिटरचे सी.पी.एल. पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याबाबत आदेश दिला, व सुनावणीची पुढील तारीख २३/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३)	दिनांक २३/०९/२००८ अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या नविन मिटर बाबतची कागदपत्रे मंचात दाखल केली अर्जदार प्रतिनिधी त्यांच्या येथुन काढुन नेण्यात आलेल्या वीज मिटरची तपासणी न करताच त्यांना वीज चोरीच्या प्ररकरणात गुंतवण्यात आले असल्याचे तसेच पोलिस कार्यवाहीला घाबरून त्यांची महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेली देयके भरली असल्याचे सांगितले.

४) दोन्ही बाजुकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रा वरून असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वीज वापरासाठी वीज पुरवठा घेतला असून त्यांना महावितरण कंपनीतर्फे दोन वीज मिटर बसविण्यात आले. यापैकी एक मिटर सौ.निर्मलादेवी जुगलकिशोर अग्रवाल यांच्या नांवे असुन त्यांचा ग्राहक क्रमांक हा ५१००३०३४३०१६ असा असून मिटर क्रमांक ८०५५२०० असा आहे, दुसरे मिटर हे श्री पांडुरंग बंकटलाल आग्रवाल यांच्या नांवे असून त्याचा ग्राहक क्रमांक हा ५१००३०३५९७३५ असा असून मिटर क्रमांक ४०८६३४ असा आहे.

वरील दोन्ही मिटर हे एकाच ठिकाणी असल्यामुळे व त्यातील एक हे आम मुखत्यारपत्र धारक श्री जुगलकिशोर बंगटलाल अग्रवाल यांच्या पत्नीच्या नावे आहे.व दुसरे वीज मिटर हे त्यांच्या भावाच्या नावे आहे. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षकाराने ही तक्रार एकाच कुंटुबातील असल्यामुळे एकत्र चालवण्यास मान्यता दिल्यामुळे मंचाने या दोन्ही प्रकरणात एकत्र सुनावणी घेतली महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून, दिनांक ०२/०१/२००८ रोजी अर्जदाराच्या येथे करण्यात वीज संच मांडणीच्या निरिक्षण अहवालावरून तसेच पंचनाम्यावरून असे आढळुन येते की, सौ. निर्मलादेवी जुगजकिशोर अग्रवाल तसेच श्री पांडुरंग बंकटलाल अग्रवाल यांच्या नांवे बसविण्यात आलेल्या मिटर चे बॉडी सिल हे तुटलेले आढळले असल्याचे नमुद केलेले आढळुन येते. महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-यांनी दिनांक ०३/०१/२००८ रोजी हे दोन्ही मिटर काढुन त्या ठिकाणी नविन मिटर बसविले अर्जदाराच्या याच जागेवर चार नविन मिटर हे दिनांक ०२/०१/२००८ रोजी केलेल्या पाहणी नंतर बसविण्यात आले असल्याचे आढळुन आले. अर्जदारांच्या जुन्या दोन मिटरवर होत असलेल्या वीज वापराच्या एकुण वीज भारापैकी काही वीज भार हा नविन चार मिटरवर टाकण्यात आला असल्याचे दिसुन येते. या दोन्ही वीज वापराचा तुलनाआत्मक विचार केल्यास जुन्या मिटर वरील वीज वापराची

नोंद कमी प्रमाणात होत होती हे स्पष्टपणे दिसून येते, महावितरण कंपनीतर्फे मिटर सिल तुटलेली आहे या एकाच निरीक्षणावरून अर्जदारास वीज चोरीचे बिल दिले आहे. अर्जदाराचे मिटर न तपासता फक्त सिल तुटलेले आहे म्हणून वीज चोरीचे बिल आकारणे हे वीज कायदा २००३ मधील संबंधीत कलमानुसार नसल्याचे मंचाचे मत आहे. अशा प्रकरणात अर्जदारास कलम १२६ अंतर्गत वीज बिल आकारणी करणे योग्य ठरले असते. वीज कायदा २००३व महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांच्या अधिनियमानुसार कलम १२६ व १३५ अंतर्गत असलेल्या तक्रारी या मंचाच्या कार्यक्षेत्राबाहेर असल्यामुळे, व अर्जदारानी दाखल केलेली ही तक्रार या कलमा अंतर्गत येत असल्यामुळे अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१२६/२००८/४७** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२)१)सौ.निर्मलादेवी जुगलकीशोर अग्रवाल,**
**रा.नारायण नगर मंठा चौफुली,जालना,**
**ता.जि. जालना. (ग्राहक क्र.५१००३०३४०१६)**

**२)श्री पांडुरंग बकटलाल अग्रवाल,**
**रा.नारायण नगर मंठा चौफुली,जालना,**
**ता.जि. जालना. (ग्राहक क्र.५१००३०३५९७३५)**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/जालना/ १२६/२००८/४७ गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**